विधायक

# नवनिर्माणाच्या दिशेने...

अक्षय निर्मळे

'यूथ फॉर पर्पजफुल लाइफ' हे ब्रीद घेऊन 'निर्माण'चे काम सुरू आहे. डॉ. अभय व डॉ. राणी बंग दाम्पत्याचे सुपुत्र अमृत या शिबिराचे संयोजन करतात. महात्मा गांधीजींच्या 'नई तालीम' या शिक्षणपद्धतीनुसार कार्यरत असलेला हा कॅम्प हल्ली समाजासाठी काही तरी करू पाहणाऱ्या तरुणाईच्या अजेंड्यावर असतो. करिअर आणि समाजभान, सामाजिक काम याविषयी नेमकी स्पष्टता देणाऱ्या या कॅम्पमध्ये आतापर्यंत कोल्हापूर, सांगली, सातारा येथील अनेकांनी सहभाग घेतला आहे. त्यातील काही शिबिरार्थींच्या शिबिरातील आणि शिबिरानंतरच्या अनुभवाविषयी जाणून घेतलेल्या भावना...

कॉलेजवयात बरेच जण कन्फ्युज असतात. पुढे काय करायचं? सध्या जे करत आहोत, त्याचे आउटपुट काय? पालक काय सुचवताहेत आणि मला मनापासून काय करावंसं वाटतं? या प्रश्नांच्या उत्तराबाबत संदिग्धता असते. विचारांत स्पष्टता नसते. एकूणच करिअर, सामाजिक भान याविषयी ते पूर्णतः किंवा अंशतः अनभिज्ञ असतात. फक्त एकच भावना कॉमन असते, जी आपल्या संस्कारांतून आलेली ती म्हणजे समाजासाठी काही तरी करण्याची भावना. पण नुसती भावना असून काय उपयोगाचे, तर त्याला निश्चित दिशा आणि त्याबरहुकूम कृती कार्यक्रमही हवा. आणि नेमकं हेच देण्याचं काम 'निर्माण'च्या शिबिरांतून होत आहे. 'निर्माण' हे आता फक्त एक शिबिर राहिलेले नाही, तर ती एक चळवळच बनली आहे आणि कसलाही गाजावाजा न करता अगदी शांतपणे ही चळवळ हळूहळू पुढे चालली आहे.

ही चळवळ आहे तरुणाईची... समाजकार्याच्या जाणीव जागृतीची... तरुणाईला समाजकार्याप्रति प्रवृत्त आणि कार्यप्रवण करण्याची. शिबिरात सहभागी झालेले शिबिरार्थी सामाजिक बदलाचे एजंटच झाले आहेत, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. त्यानुसार त्यांचे कार्य चालू आहे. काहींची विचारप्रक्रिया सुरू असून तेही त्या वाटेवर आहेत. एकूणच चांगल्या समाजासाठीच्या नवनिर्माणाच्या दिशेने या तरुणाईची वाटचाल सुरू आहे...



## नेमकं व्यवस्थापन शिकायला मिळाले...



मी बीटेकचा विद्यार्थी. मी 'निर्माण'चे दोन कॅम्प केले. भविष्यात काय करायचे आहे, याची दिशा 'निर्माण'ने दिली. आपला ॲप्रोच कसा असावा, हे देखील सांगितले. नेमकं व्यवस्थापन शिबिरातून शिकायला मिळाले. शिबिरानंतर 'अवंती' या कंपनीसाठी काम सुरू केले. पूर्वी ही संस्था एनजीओ म्हणून काम करत होती. आता ती स्टार्टअप कंपनी आहे. या कंपनीला फोर्ब्ज मासिकानेही गौरविले आहे. ग्रामीण भागात कमी पैशांमध्ये शिक्षण देण्याचे काम ही संस्था करते. ग्रामीण मुलांना याचा चांगला फायदा होत आहे. अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांना पैशाअभावी चांगले शिक्षण घेता येत नाही. त्यांना मदत करण्याचे काम या संस्थेच्या माध्यमातून आम्ही करतो. त्यांना कोचिंग, गायडन्स देण्याचे काम आम्ही करतो. यातून सिलेक्ट केलेल्या मुलांना आम्ही १०० टक्के स्कॉलरशिप देतो. नुकतेच याद्वारे एका विद्यार्थ्याला एमआयटीमध्ये शिकण्याची संधी उपलब्ध झाली आहे. निर्माणच्या मार्गदर्शनामुळेच अशा पद्धतीचे काम करू शकलो.

**- केयूर गोखले**

## प्रत्येक दिवसाचं प्लॅनिंग शिकले...



मी इंजिनिअरिंगची विद्यार्थिनी. माझे बाबा दर सहा महिन्यांनी सर्चमध्ये जात असतात. त्यातून 'निर्माण'चा कॅम्प करायचा ठरवले होते. गेल्या वर्षी मी कॅम्प केला. नवखी होते; पण ८-९ दिवसांच्या सहवासात असं काही वाटलं नाही. अमृतदादाने खूप चांगले मार्गदर्शन केले. तिथं प्रत्येक दिवसाचं प्लॅनिंग होतं. मोठे लोक आम्हाला मार्गदर्शन करायला होते. वेगवेगळ्या समाजोपयोगी उपक्रमांत सहभागी असलेले, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय एनजीओंमधील, आयआयटी-आयआयएममधील लोकांनी मार्गदर्शन केले. हा अनुभव खूप जबरदस्त होता. समाजासाठी फुलटाइम काम करायचे की पार्टटाइम? करिअर निवड कशी करायची? आणि त्यातून समाजाला कशा प्रकारे फायदा होईल? याविषयी मंथन झाले. समाजातील समस्यांची जाण, त्यावरच्या सोल्युशनबाबत माहिती मिळणे, हा अनुभव खूप चांगला होता. कॅम्पहून आल्यावर त्याचा हँगओव्हर उतरेपर्यंत आता मला दुसऱ्या कॅम्पला जाण्याची ओढ लागली आहे. या वर्षीच हा कॅम्प होईल.

**- पूजा पाटील**, सांगली

## सकारात्मक बदलाचा भाग बनण्याची प्रेरणा



मी इंजिनिअरिंगचा विद्यार्थी. 'निर्माण'च्या शिबिरातून नेमकी दिशा मिळाली. बऱ्याच गोष्टी क्लिअर झाल्या. खूप चांगल्या लोकांनी मार्गदर्शन केले. मी पश्चिम महाराष्ट्रातला; पण शिबिराच्या निमित्ताने विदर्भाचा काही भाग अनुभवता आला. दोन महिने मी मराठवाड्यात राहिलो आहे. तिथल्या दुष्काळाची तीव्रता माहिती आहे. तिथे आम्ही दुष्काळ निवारणासाठी कामही केले. सध्या मी पालघर जिल्ह्यात वाढा तालुक्यातील क्वेस्ट (Quest) या संस्थेसाठी काम करतो. ही संस्था आदिवासींसाठी आश्रमशाळा चालवते. या संस्थेअंतर्गत आम्ही सक्षम हा प्रोजेक्ट चालवत आहोत. त्यातून सकारात्मक बदल घडविण्याचा उद्देश आहे.

**- विकास वाघमोडे**, सांगली

## नेमक्या उपयांचा दृष्टिकोन मिळाला...



मी इंजिनिअरिंगचा विद्यार्थी आहे. समाजाकडे बघण्याची नेमकी दृष्टी 'निर्माण'च्या शिबिराने दिली. समाजाप्रति कर्तव्याची भावना प्रत्येकाकडे असू शकते. पण त्यावरील सोल्युशन काय असू शकेल किंबहुना ते काय आणि कसे असावे, याचा विचार करण्याची दृष्टी शिबिराने दिली. पण कृतीतून अनुभवण्याची गरज शिबिराने शिकवली. उपयोजित शिक्षणाचा विचार करायला लागलो आहे. एक पक्कं ठरवलं आहे. जिथं माझी गरज आहे तिथंच काम करेन. जगण्यासाठी जितके पैसे लागतील तितकेच ठेवीन. अभियांत्रिकीच्या अभ्यासातही समाजाला उपयोगी ठरतील, अशा प्रोजेक्टवर विचार आणि त्या दिशेने काम सुरु आहे.

**- प्रफुल्ल सुतार**


## 'स्वत:कडून समाजाकडे' मनावर कोरले...



मी इंजिनिअरिंगची विद्यार्थिनी. डॉ. राणी बंग यांचे 'तारुण्यभान' हे शिबिर केलं होतं आणि त्यानंतर 'निर्माण'विषयी कळले. निर्माणच्या कॅम्पलाही जायचे निश्चित केले. माझ्यात सकारात्मक बदल होण्यास हे शिबिर खूप अर्थांनी महत्त्वाचे आहे. 'स्वतःकडून समाजाकडे...' अशी एक विचारधाराच यातून तयार झाली. समाजातील प्रश्न, समस्यांना सामोरं कसं जायचं, याची नेमकी दिशा शिबिरातून मिळाली. छोट्या-छोट्या गोष्टीतून कशी सुरवात करावी, सोल्युशन काय आणि कसं असावं, याचा नेमकेपणा येत गेला. शिबिरादरम्यान आदिवासी गावांतून राहिलो. त्या वातावरणाशी संलग्न झालो. त्यांची परिस्थिती वाईट होती; पण फक्त लांबून बघण्यात किंवा परिस्थितीला नावे ठेवण्यात काही उपयोग नव्हता. प्रत्यक्ष कृती आवश्यक होती. त्यांची सिस्टीम, न्यायनिवाडा या गोष्टी समजून घेतल्या. आपण काय करायला हवं, याची जाणीव शिबिराने दिली. सध्या मी पुण्यातील 'कनेक्टिंग' नावाच्या एनजीओसोबत काम करत आहे. ही संस्था आत्महत्या प्रतिबंधात्मक स्वरूपाचे काम करते. त्यासाठी हेल्पलाइन चालवते. त्यातून आम्ही अशा लोकांना इमोशनल सपोर्ट देण्याचे काम करतो. मी अशा सामाजिक कृत्यांकडे वळण्याचे कारण म्हणजे 'निर्माण'.

– **जुई जामसांडेकर,** कोल्हापूर

## शिबिरात आलो आणि इथलाच झालो...



मी इंजिनिअरिंगचा विद्यार्थी. २०१० मध्ये 'सर्च' जॉइन केले. निर्माणच्या चौथ्या बॅचचा मी शिबिरार्थी होतो. मला नेमके काय करायचे आहे, ते या शिबिरांतूनच ठरवू शकलो. त्यानंतर 'सर्च'च्या हॉस्पिटलशी जोडलो गेलो. मी सध्या गडचिरोलीतच निर्माण आणि सर्चसाठी काम करत आहे. एम-हेल्थ म्हणजेच मोबाइल हेल्थ या यंत्रणेवर माझे आणि माझ्या सहकाऱ्यांचे काम सुरू आहे. मोबाइल फोन तंत्राचा आरोग्यासाठी वापर कसा करता येईल या अनुषंगाने हे काम आहे. एम-हेल्थतर्फे आरोग्यसेवा दिली जाते. येथील हॉस्पिटलमार्फत आम्ही सेवा देतोच; पण गावागावांत नेमलेल्या आरोग्यदूतांमार्फतही ही सेवा दिली जाते. रुग्णांच्या आजाराचे निदान आणि सेवा या आरोग्यदूतांमार्फत दिली जाते. शिवाय आजारांविषयीची माहिती, जसं की कारणे, लक्षणे हा डाटा एकत्रित केला जात आहे. आरोग्य सेवा आणि संशोधनासाठी आम्ही ॲप डेव्हलप करत आहोत. येथील हॉस्पिटलमध्ये रुग्णांची सर्व माहिती एका क्लिकवर मिळण्यासाठी ईएमआर (इलेक्ट्रिकल मेडिकल रेकॉर्ड) नावाचे सॉफ्टवेअरही आम्ही बनवले आहे.

– **निखिल जोशी,**
राजारामपुरी, कोल्हापूर.

## जीवनाचा अर्थ शोधणाऱ्यांसाठीचा फुलस्टॉप



मी एमबीबीएसचा विद्यार्थी. 'निर्माण'चा कॅम्प माझ्यासाठी खूप महत्त्वाचा होता. जीवनाचा अर्थ शोधणाऱ्यांसाठी निर्माण हा फुलस्टॉप आहे, असं मी म्हणेन. आपल्याकडे बरेच तरुण भरकटलेल्या अवस्थेत असतात. काय करायचे आहे? का करायचे आहे? याची नेमकी कल्पना नसते. त्यामुळे अर्थपूर्ण जीवनाचा शोध ज्यांना कुणाला घ्यायचा आहे, त्यांनी 'निर्माण'चा कॅम्प करावा. हा कॅम्प म्हणजेच जीवनाला अर्थ देणारी एक प्रक्रिया आहे. गरजांवर आधारित सोल्युशन यातून मिळू शकते. मी चारही कॅम्प केले. यातून समाजासाठी काम करताना नेमका विचार कसा करावा, दिशा काय असावी, याचे पक्के मार्गदर्शन मिळाले. तिथून आल्यावर माझ्या पातळीवर स्थानिक समस्या काय आहेत, त्यावर सोल्युशन काय होईल, याचा शोध घेण्याचे काम केले. मी आरोग्यविषयक समस्यांवर काम करतो. दोन टप्पे ठरवले आहेत. लाँग टर्म आणि शॉर्ट टर्म असे. ६ महिन्यांपासून ते ५ वर्षांपर्यंतचा कालावधी त्यात आहे. यामध्ये काय करणार आहोत, याचा कृती कार्यक्रमही तयार आहे. ही स्पष्टता देण्याचं काम 'निर्माण'ने केले. शिबिरानंतर सांगलीतील जत तालुक्यातील एनजीओ येरळा प्रोजेक्ट सोसायटी या दुष्काळी भागात काम करणाऱ्या संस्थेत काम केले. तसेच सोलापुरातील 'पालवी' या एड्सग्रस्तांसाठी काम करणाऱ्या संस्थेसाठी काम केले.

– **डॉ. मुकुंद जाधव,** सांगली